# सुंदर तें ध्यान

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ५०३



REFBK-0010796

६४९६६
२२।३।६७
५०३

# सुंदर तें ध्यान

## पंढरपूरचा पांडुरंग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

शंभूराव रामचंद्र देवळे

REFBK-0010796

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन माला : १

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : ९६ : ४ [ ६-६९ ]

卐

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

卐

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन १

卐

चौथी आवृत्ति :
शके १८९१
सन १९६९

卐

किंमत ६० पैसे

卐

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
करिता
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २.

卐

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ,
पुणें २.



सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ॥

हें वर्णन आपल्या कानावर वारंवार पडत असतें. या वर्णनाचा पांडुरंग म्हणजेच विठोबा आहे पंढरपुरांत. प्रतिवर्षी आषाढी एकादशीला लक्षावधि वारकरी या विठ्ठलाच्या दर्शनासाठीं न चुकता येत असतात. अखिल हिंदुस्थानात जशी काशी तसें साऱ्या महाराष्ट्रांत पंढरपूर.

या पंढरपुरात जाऊन विठ्ठलाच्या मूर्ती-शिवाय आणखी काय काय पहायचें, कशा-कशाचें दर्शन घ्यायचें, हें सगळें या पुस्तकात सांगितलें आहे. तेथें कोण कोण थोर संत येऊन गेले, पंढरपूरला पालख्या कशा येतात, तेथें उत्सवाचा सोहळा कसा पार पडतो, हें सारें या पुस्तकावरून समजतें.



## : १ : चला जाऊं पंढरीला

चार पावसांनीं चैत्र-वैशाखाचा [illegible] धुऊन काढलेला असतो. सरत्या ज्येष्ठांतलें औलसर वातावरण घरांत माणसाच्या जिवाचा कोंडमारा करून त्याला जणूं बाहेर बोलावीत असतें, त्याला उंबरठ्याबाहेर खेचीत असतें. हिरवी पोपटी सृष्टि माणसाला भुरळ पाडून सांजसकाळ साद घालीत असते अशाच दिवसांत एकदां एका पहाटे मी जागा झालों. सगळीकडे अगदी शांतता होती. कोठेंतरी फेरी मारून येण्याचा विचार होता. तळ्यांतल्या गणपतीचें दर्शन घेऊन यावें आणि उत्साह वाटला तर पर्वतीवर जाऊन वरच्या उत्साही वातावरणांत प्रसन्न मनानें विसांवा घ्यावा असा विचार होता. पण इतक्यांत कोपऱ्यावरच्या विठ्ठलमंदिरांत पांचचे टोल पडले आणि त्यामागोमाग एकतारीचे सूर कानांवर आले. त्या एकतारीच्या सुरांत कोणीतरी भक्त प्रभूचा भाट बनून आपल्या गोड आवाजांत एखादा अभंग म्हणत प्रभूला जागवीत होता.

तो अभंग कानीं आला आणि माझे सारे बेत पार विरघळले. न कळत माझे पाय प्रभूच्या मंदिराकडे वळले आणि माझी वाणी प्रभूचें गुणगान आळवूं लागली.

सुदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ॥ १ ॥
तुळसीहार गळा कासे पीतांबर ।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभमणी विराजत ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

मग मला सकाळच्या फिरण्यापेक्षां कटेवर कर ठेवून विटेवर उभा असलेल्या पांडुरंगाचे अभंग म्हणणें अधिक हिताचें वाटलें. आपला देह हा पांच तत्त्वांचा, तो सहजीं जाणार. तेव्हां आपल्या या नरदेहाचें हित व्हावें म्हणून कांही आत्महित साधण्याचा मी प्रयत्न करतों.

मला नोकरीचाकरी आहे, बायकामुलें आहेत; हें सारें माझ्या ध्यानांत आहे. आणि त्यांच्या उद्धाराकरितांच मी हा अभंग म्हणतों. पण आज आकस्मिक रीतीनें या अभंगाचें महत्त्व माझ्या ध्यानांत आलें.

मी आज येथें पुण्यांत अभंग म्हणत आहें. पण माझे डोळे पंढरीच्या वाटेकडे लागले आहेत. आणखी चार दिवसांत वारकरी देहूहून आणि आळंदीहून येथें येऊन पोहोंचतील. त्यांच्याबरोबर ज्ञानोबा आणि तुकोबा यांच्या पालख्या येतील. त्या पालख्यांबरोबर गेलीं पांच वर्षें मी पंढरीला जात आहें.

या कामांत मीं आपला वेळ फुकट घालविला का? त्या दगडाच्या मूर्तीमध्यें आहे तरी काय? असे प्रश्न कुणाला पडतील; पण

हा सारा तर्कवाद बाजूला ठेवून माझ्याकरितां तरी तुम्ही एकवार पंढरीच्या वारीला येऊन तर पाहा.

प्रार्थना समाज, सत्य समाज, आर्य समाज, थिऑसफीचा पंथ, अरविंदांची पाँडेचरी, ही सुशिक्षितांची धर्मपीठे; त्यांपैकीं कोठें-तरी जावें, असें कोणाकोणाला वाटतें; पण यापैकींच एका पीठाचे कुलगुरु न्यायमूर्ति रानडे काय म्हणतात पाहा.

सत्तर वर्षापूर्वीचा गोष्ट आहे. पुण्याच्या नगरवाचन मंदिराच्या खिडकीपाशीं न्यायमूर्ति रानडे बसले होते. समोरून पालख्या आल्या. हजारों वारकरी पताका घेऊन विठ्ठलनामाचा गजर करीत देहभान विसरून नाचत होते. तो सुखसोहळा पाहून न्यायमूर्तींचें हृदय भरून आलें. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. जवळच असलेला एक वाचक म्हणाला, " रावसाहेब, आपण टाइम्स वाचत आहात, त्यांत एखादी दुःखद बातमी आहे का ? "

न्यायमूर्ति म्हणाले, " माझ्या चर्मचक्षूंसमोर टाइम्स आहे; पण माझ्या अंतश्चक्षूंसमोर पंढरपूरचें देवालय दिसत आहे. आज सातशें वर्षें झालीं, लक्षावधि विरक्त वारकरी कोणतीहि संघटना नसतांना, सभासदत्व नसतांना प्रतिवर्षी श्रद्धेनें पंढरपुरास जात आहेत आणि आमच्या प्रार्थना समाजाचे सभासद आमच्या देखत कमी होत आहेत. "

न्यायमूर्ति रानडे हे मूळचे संतप्रवृत्तीचे होते. आपणां सर्वांनाच त्या प्रवृत्तीनें संसार सुखाचा करतां येईल. म्हणून माझ्या बरोबर एक वेळ तरी पंढरीच्या वारीला चला.

❀ ❀ ❀

# : २ : पालख्यांचा प्रवास

ज्येष्ठ वद्य नवमीला तुकाराम आणि ज्ञानेश्वर यांच्या पालख्या पुण्यांत आल्या आणि त्यांच्याबरोबर शेंकडों वारकरी पंढरीला निघाले.

पालखीच्या प्रवासाचा हा देखावा आतां डोळे भरून पाहा— त्या पहा सामान भरलेल्या बैलगाडया सर्वांच्या पुढें चालल्या आहेत. शेंकडों वारकरी आपापल्या पडशा खांद्यावर टाकून अभंग म्हणत, भजन करीत चालले आहेत. ती पहा हरिजनांची पहिली दिंडी. ते पहा देवाचे सजलेले घोडे. त्यांच्यामागून शेंकडों पताका घेतलेले वारकरी चालले आहेत. त्या पहा निरनिराळ्या फडकऱ्यांच्या दिंड्या आणि त्यांच्यामागून पालखी चालली आहे. पालखीच्या मागें मैलभर सारा समाज पसरला आहे. सर्वांच्या मागें ही गंमत पाहात आपण चाललों आहोंत. ती पहा लाल, हिरवीं आणि निळ्या कांठाचीं लुगडीं, पुरुषांचीं मुंडाशीं आणि पगड्या. तुम्हांला कसा काय वाटतो हा देखावा? झेंडेकऱ्यांचे उंच फडकणारे झेंडे, दोन्ही बाजूला मैलभर पसरलेलीं काळीभोर नांगरलेलीं शेतें, लांब क्षितिजा-जवळच्या टेकडया, रस्त्यावरची हिरवळ आणि वरती पावसाळी ढगांतून डोकावणारें आकाश. देखावा कितीहि बघितला तरी डोळ्यांची तृप्ति होत नाही.



अशा ह्या पालख्या सासवडला पोहोंचल्या. बायकापुरुषांचा पहिला उद्योग म्हणजे पहांटे आंघोळ करून धुऊन आणलेली ओलीं पांघरुणें वाळवणें. सर्व जागा रंगीबेरंगी पट्ट्यांनीं भरून गेली ठिकठिकाणी चुली पेटल्या. निळसर धूर व हलणाऱ्या ज्वाला उन्हांत तरळूं लागल्या. टाळमृदंगांचा आवाज घुमूं लागला. पालखीपुढें भजन सुरू झालें.

अभंग

घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
तुम्ही घ्यारे डोळे सुख पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥
तुम्ही ऐका रे कान माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥
मना तेथें धाव घेई राहे विठोबाचे पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे जीवा नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

अशा प्रकारें नामसंकीर्तन करीत, भजनें म्हणत ज्ञानोबाची पालखी पंढरपुराकडे चालली होती. ठिकठिकाणी लोक पालखीचें स्वागत करीत होते. मोठ्या भक्तिभावानें आणि जिव्हाळ्यानें गांवकरी वारकऱ्यांना जेवण वाढीत होते एका गांवांतील लोहारानें हंडा भरून चटणी व गाडी भरून भाकऱ्या आणल्या आणि त्या वारकऱ्यांना वाटल्या.

वाटेंत माझ्या वहाणेचा बंद तुटला. मीं समोर पाहिलें तों एक चांभार वहाणा नीट करून देत होता. त्याच्याभोंवती गर्दी होती. मी आपली वहाण त्याच्यापुढें ठेवली. ती दुरुस्त झाल्यावर आमच्यांत पुढील गमतीदार संवाद झाला.

मी : चांभारदादा या दुरुस्तीचे किती पैसे द्यायचे ?

चांभार : मला याचे कांहीं पैसे नकोत.

मी : अरे, मी गरीब वारकरी नाही. मी या कामाचे पैसे देऊं शकतों.

चांभार : महाराज, आपण गरीब असा कीं श्रीमंत असा, विठ्ठलाच्या दरबारांत सारे सारखेच. आमच्या संत रोहिदासानें आम्हांला सांगून ठेवलें आहे कीं, वारीला जातांना दुरुस्तीचे पैसे घ्यायचे नाहींत. यात्रेंत मी हीच ज्ञानोबा माउलीची सेवा करतों. माउली मला इतर वेळीं पोटभर देते.

मी : अरे तूं तर सत्ययुगांतला चांभार दिसतोस. मजजवळ कॅमेरा असता तर तुझा फोटो घेऊन तोच वर्तमानपत्रांत छापायला दिला असता.

चांभार : मला फोटो नकोत. शरीर हाच एक फोटो आहे. विठ्ठलाचे फोटो छापा. आमच्या तुकोबांनी सांगितलं आहे :

मान दंभ चेष्टा । जणू सूकराची विष्ठा

अखेर मी आमचा हा वाद येथेंच थांबविला. जे वहाणा-दुरुस्तीचे चार आणे द्यायचे होते, ते एका लंगड्या वारकऱ्याला देऊन टाकले.

पालखी पाहात असतांना भोंवतालच्या सृष्टिसौंदर्याकडे आपलें लक्षच नाहीं. हा समोरचा मळा पाहिलांत का कसा हिरवा-गार दिसत आहे? मला तर त्या ठिकाणीं हरीची सेवा या बुद्धीनें काम करणारा सांवता माळी उभा आहे, असें वाटतें. तो पहा, एका फडांत सांवता माळ्याचा अभंग चालला आहे :

कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥
लसूण मिरची कोथिंबिरी, अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥
मोट नाडा विहीर दोरी, अवघी व्यापिली पंढरी ॥ ३ ॥
सावता म्हणे केला मळा, विठ्ठलपायीं गोविला गळा ॥ ४ ॥

ऐकलांत ना अभंग? सांवता माळ्याला सर्व वस्तुजातामध्यें भगवत दिसत होता. त्याच्या आचरणामध्यें अद्वैत मुरलेलें होतें. अद्वैताचा अनुभव घेणें, हेंच वारकरी पंथाचें कार्य.

❖ ❖ ❖


आतां हें दुसरें दृश्य पाहा :

तो तरुण मुलगा घोड्याचा लगाम धरून पुढें चालला आहे आणि घोड्यावर त्याचे म्हातारे आईबाप बसले आहेत. तुम्ही म्हणाल, यांत विशेष पाहाण्यासारखें काय आहे ? पण आपल्या शहरामध्यें असें दृश्य आपणाला दुर्मिळ आहे. या अशिक्षित तरुणाला सेवा करण्याची ही स्फूर्ति कोणी दिली आहे ?

पुंडलिकानें.

कोण हा पुंडलीक ? कोणी राजा होता की काय ! नाही. हा पुंडलीक एक बाईलवेडा तरुण होता. तो आपल्या आईबापांचा छळ करी. बायकोला घोड्यावर बसवून आईबापांना पायीं चालवी. पुढें एका प्रसंगांत एका ऋषीनें त्याला उपदेश केला. पुंडलिकाचे डोळे उघडले. त्यानें मायबापांच्या सेवेचें खडतर व्रत आचरलें. त्याच्या या सेवेनें संतुष्ट होऊन प्रत्यक्ष विठ्ठल त्याला भेटायला आला. आईचे पाय चेपण्यांत मग्न असलेल्या पुंडलिकानें देवाकडे एक वीट टाकली आणि त्याला त्या विटेवर थोडें थांबायला सांगितलें. कटेवर हात ठेवून अठ्ठावीस युगें तो विटेवर उभा आहे, असें संत सांगतात.

पुंडलिकाच्या भेटीला परब्रह्म साकार होऊन आलें,हा पुंडलीक अकराव्या शतकांत झाला असावा. याच्यामुळेंच पंढरपूर क्षेत्र उदयाला आलें. त्या प्रसंगानंतर या महाराष्ट्रांत शेंकडों राजे आले, आणि गेले; पराक्रम आणि ऐश्वर्य यांचा दिमाख दिसला आणि आटोपला: पण संतजीवन चिरकाल राहिलें. राजसत्ता लोपली पण संतांची प्रेमळ शिकवण लोकांच्या जीवनावर परिणाम करीत राहिली. कायदे बदलले पण संतबोध अबाधित राहिला. राजवाडे उद्ध्वस्त झाले; पण संतमंदिरें मात्र अचल राहिली.



पंढरपूर येथील चंद्रभागेचें तीर, पुंडलिकाचें मंदिर

❀ ❀ ❀

# : ३ : पंढरीचा महिमा

संतांच्या पालख्या प्रवास करीत करीत पंढरपूरच्या अलीकडे तीन मैलांवर वाखरी या गांवीं आल्या. हवेंत किंचित् ओलावा आहे, पण वातावरण प्रसन्न आहे. निरनिराळ्या अभंगांचे चरण कानांवर पडूं लागले. ' ये गे ये गे विठाबाई ', ' पैल आले हरि ' इत्यादि अभंगांच्या चरणांनी वातावरण दुमदुमून गेलें. इतक्यांत सर्व दिंड्या थांबल्या. ' जय जय विठोबा रखुमाई, जय जय विठोबा रखुमाई ' हें भजन ठेक्यांत सुरू झालें. टाळ जोरानें वाजूं लागले. मृदंगाच्या धिमीधिमी आवाजाची लय भरभर वाढूं लागली. सभोंवतालच्या लोकांचीं अंगेंहि तालांत हलूं लागलीं. इतक्यांत तांबूस रंगाच्या घोड्यावर बसलेला स्वार तेथें आला. रुप्याच्या

काठीत बसविलेलें निशाण त्याच्या हातांत शोभत आहे. त्याच्या मागून एक मोकळा घोडा हातांत धरलेला एक इसम धांवत धांवत पालखीपर्यंत येत आहे. अनेक वारकऱ्यांनी त्या घोड्याला नमस्कार केला. दोन्ही घोडे आपले खूर खाली टेकून पालखीजवळ वाकले. नंतर दोघेहि दौडत परत गेले. मुक्या जनावरांचा हा भक्तिभाव पाहून साऱ्यांच्या मनांत श्रद्धा जागृत झाली आहे.

पण हे घोडे कसले आहेत पालखीबरोबर ?

तो रिकामा पांढरा घोडा आहे ना, तो देवाचा. त्याच्यावर रेशमी खोगीर आहे. त्याच्या आधीं निशाण घेऊन येणारा स्वार होता, तो देवाचा स्वार. हे दोन्ही घोडे एका सरदारानें देवाच्या सरंजामाकरितां दिलेले आहेत.

अशा या संतांच्या पालख्या प्रवास करीत करीत पंढरपूरच्या अलीकडे तीन मैलांवर वाखरी या गांवीं आषाढ शुद्ध दशमीच्या दिवशी येतात. या दिवशी महाराष्ट्रांतून निरनिराळ्या संतांच्या सुमारें साठ पालख्या येथें जमतात. आळंदीहून ज्ञानेश्वर महाराजांची, देहूहून तुकाराम महाराजांची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्ति-नाथांची, पैठणहून एकनाथांची अशा निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या संतांच्या पालख्या येथें एकत्र जमतात आणि दशमीच्या दिवशीं दुपारी त्या साऱ्या क्रमानें पंढरपूरला जायला निघतात. मिरवणुकीत ठिकठिकाणच्या दिंड्या असतात. दिंड्यांतून आठ वर्षां-च्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत सारी माणसें असतात. कित्येक वारकरी दरवर्षी नेमानें येतात. उदाहरणार्थ, तुकारामाच्या घराण्यांत आठ पिढ्या पंढरीची वारी होती. मिरवणुकीत कित्येक स्त्रियांच्या डोक्यावर तुळशीवृंदावनें असतात. संतांच्या नामघोषांत दशमीच्या रात्रीं साऱ्या पालख्या पंढरपुरांत पोहोंचतात. एकादशीला पंढरपूरला लाखों यात्रेकरू जमतात. सगळे एकाच विठ्ठलाचे भक्त.

याच चंद्रभागेच्या वाळवंटांत नामदेवांनीं आणि तुकारामांनीं आपले गोड अभंग म्हणून दाखविले. येथेंच 'ज्ञानियांचा राजा' ज्ञानदेव यांचीं पावलें उमटलीं आहेत, असें कांहीं भक्तांना वाटतें. येथेंच गोरोकाकांची ब्रह्मानंदीं टाळी लागली. इथेंच चोखोबानें देवाला बजावलें कीं—

ऊस डोंगा परि – रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया रंगा ॥ १ ॥
कमान डोंगी परि – तीर नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया रंगा ॥ २ ॥
नदी डोंगी परि – जळ नोहे डोंगें
काय भुललासी वरलिया सोंगें ॥ ३ ॥
चोखा डोंगा परि – भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥ ४ ॥

पंढरपूरचें माहात्म्य निरनिराळ्या संतांनी वर्णिलें आहे.

संत बहिणाबाई म्हणते :

उदंड ऐकिला उदंड गायिला ॥
उदंड देखिला । क्षेत्रमहिमा ॥ १ ॥
पंढरीसारखें । नाहीं क्षेत्र कोठे ॥
जरी तें वैकुंठ । दाखविलें ॥ २ ॥
ऐसी चंद्रभागा । ऐसें भीमातीर ॥
ऐसा विटेवर । देव कोठें ? ॥ ३ ॥
ऐसें वाळुवंट । ऐसी हरिकथा ॥
ठाईं ठाईं देखा । दिंडीभार ॥ ४ ॥
ऐसे हरिदास । ऐसें प्रेमसुख ॥
ऐसा नामघोष । सांगा कोठे ॥ ५ ॥
बहिणी म्हणे आम्हां । अनाथाकारण ॥
पंढरी निर्माण । केली देवें ॥ ६ ॥

नामदेवांनीं केलेलें वर्णन पहा :

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान ।
आणिक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥
हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं ।
मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥ २ ॥
मुखीं नाम सदा संतांचें दरुशन ।
जनीं जनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥
नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारीं ।
कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ ४ ॥

## : ४ : संत भानुदास

चला, आतां आपण विठोबाच्या देवळांत जाऊं या. देवळाभोंवतीं हे बोळ किती अरुंद; आणि त्यांतून या गर्दीतून माणसें मुंगीच्या गतीनें पुढें सरकत आहेत. विठ्ठलमंदिराच्या महाद्वारासमोर चोखामेळ्याची समाधि आहे. फलटणचे राजे नाईक निंबाळकर यांनीं या समाधीवर डौलदार छत्री बांधली आहे. या समाधीसमोरच महाद्वाराच्या बारा पायऱ्या आहेत यांतील पहिलीच पायरी म्हणजे नामदेवाची पायरी म्हणून प्रसिद्ध आहे. नामदेवानें अखंड निद्रेकरितां या जागेची मागणी केली. नामदेव विनयानें म्हणाले, " देवा, तुझ्या दर्शनाला अनेक संत-महंत येतात. या भगवद्भक्तांचे चरण माझ्या मस्तकाला लागावेत हीच माझी इच्छा.


देवळाभोंवतालचा अरुंद रस्ता

" संतांची धूळ पडो माझ्या माथा । "

" मला मोक्ष नको, धन नको, संपदा नको, पण नेहमीं संतसंग मिळावा हीच इच्छा ! "

ही नामदेवाची पायरी पितळेच्या पत्र्यानें मढविली आहे. त्या पत्र्यावर नामदेवाचा मुखवटा बसविला आहे. आज सारे वारकरी या पायरीला पाय न लावतां, तिच्यावर डोकें ठेवून पुढें जातात. पायऱ्या चढून आंत प्रवेश केला की मुक्तिमंडप लागतो. वर नगारखाना आहे. या मंडपाच्या आंत एक प्रशस्त चौक आहे. दोन्ही बाजूंना दीपमाळा आहेत मध्यें गरुडाचें देऊळ आहे. चौकावर भव्य लांकडी छत असलेला मंडप आहे. येथें आपल्याला तुळशीचे हार आणि फुलें विकत मिळतात. ते अनेक वारकरी तुळशी-मंजिऱ्यांचे हार घेऊन मुक्तिमंडपाच्या आंतील दगडी देवालयांत प्रवेश करीत आहेत.




नामदेवाची पायरी

या मंडपाच्या उत्तरेच्या बाजूला पांडुरंगाचें शेजघर आहे. शेजघरांत विठ्ठलाचा रुप्याचा एक पलंग आहे. या शेजघराचें दार शेजारतींखेरीज इतर वेळी बंद असतें. मंडपांतून पुढें गेलें म्हणजे मुख्य गाभारा लागतो. त्यांत विठ्ठलाची मूर्ति आहे.

पण येथील ही विठ्ठलाची मूर्ति विजयनगरला कुणीतरी नेली होती. ती येथें पुनः कोणीं आणली ?

त्याचें असें झालें – सोळाव्या शतकांतली गोष्ट. त्या वेळी विजयनगरला हिंदूंचें मोठें साम्राज्य होतें. तेथील प्रसिद्ध राजा

कृष्णदेवराय याच्या कानांवर पंढरीचें माहात्म्य आलें. तो पंढरपूरला देवदर्शनाला आला. पंढरपूरचा कीर्तनसोहळा पाहून त्याला येथील विठ्ठलमूर्ति आपल्या राज्यांत नेण्याची इच्छा झाली. परकीयांच्या हल्ल्याचा उपसर्ग विजयनगरपेक्षां पंढरपूरला होण्याचा संभव जास्त, असें वाटल्यावरून त्यानें येथील मूर्ति आपल्या विजयनगरच्या राज्यांत नेली. विजयनगर येथें त्यानें मोठें मंदिर बांधलें. अलंकार आणि नवरत्नांचे हार त्यानें देवाला अर्पण केलें. पंढरीचें मोठेंपण आपल्या राजधानीला प्राप्त व्हावें, अशी त्याची इच्छा होती.



गरुड खांब

पण इकडे पंढरपुरास काय झालें ?

आषाढी एकादशीला नेहमींप्रमाणें वारकरी पंढरीला आले. ते देवळांत जातात, तों विटेवरचा विठ्ठल त्यांना दिसेना. वारकरी उदास झाले. कांहींनीं अन्नपाणी घेण्याचें नाकारलें. ते गरुड-खांबाच्या भोंवतीं हिंडून विठ्ठलभजन करीत राहिले.

त्याच वेळीं आपल्या गांवाहून एक दिंडी घेऊन एकनाथांच्या आजोबांचे वडील भानुदास मंदिरांत आले. त्यांना देवळांत देव दिसेना. वारकऱ्यांनीं त्यांना सांगितलें कीं, देवाला राजानें विजयनगरला नेलें. भानुदास म्हणाले, “ तुम्ही काळजी करूं नका. मी विठ्ठलाला परत घेऊन येतों. ”

भानुदास भजन करीत निघाले. त्यांचे पाय विजयनगराकडे चालत होते. डोळे विठ्ठलमूर्तीकडे लागले होते. हृदयांत ‘ विठ्ठल विठ्ठल ’ असा अनाहत ध्वनि उमटत होता. कांहीं दिवसांनीं मध्यरात्रीच्या सुमारास भानुदास विजयनगरांतील विठ्ठलमंदिराजवळ जाऊन पोंहोंचले. त्या वेळीं देवाच्या कृपेनें व भानुदासांच्या भक्तीनें पहारेकऱ्यांना झोंप लागली. देवळाचीं कुलपें गळून पडलीं. भानुदासांनीं

देवळांत प्रवेश केला. विठ्ठलाच्या पायाला घट्ट मिठी घातली. त्याचे पाय प्रेमाश्रूंनी न्हाणिले. त्यांनी देवाला प्रार्थना केली कीं, "हे विठ्ठला, माझ्याबरोबर पंढरपुरास चल. तूं आला नाहींस तर तेथील वारकरी पाण्याला सुद्धां स्पर्श करणार नाहींत देवा, आमची सेवा कमी पडली काय ?"

या आर्त प्रार्थनेनंतर देवानें आपल्या कंठांतील तुळशीची माळ प्रसाद म्हणून भानुदासाच्या गळ्यांत घातली. माळेबरोबर देवाच्या गळ्यांतला नवरत्नहारहि भानुदासांच्या गळ्यांत आला. पण तो भानुदासांच्या लक्षांत आला नाहीं. भानुदास मंदिराच्या बाहेर येऊन भजन करीत बसले.

पहांटेच्या वेळीं काकडआरती सुरू झाली. हार गेल्याचा पुकारा झाला. शिपायांनीं तपास केला. विठ्ठलाच्या नामस्मरणांत निमग्न झालेले भानुदास पहारेकऱ्यांनीं पाहिले. त्यांच्या गळ्यांतील नवरत्नहारहि त्यांना दिसला. भानुदासांना राजासमोर उभें करण्यांत आलें. राजानें संतापानें हुकूम दिला, "या चोराला सुळावर चढवा."

भानुदासांना सुळाजवळ नेण्यांत आलें. भानुदास " फुटो हें मस्तक तुटो हें शरीर" अशा निर्धारानें नामस्मरण करीत होते. पतिव्रता ज्याप्रमाणें प्राणेश्वराला विसरत नाहीं, त्याप्रमाणें देही असून विदेही झालेले भानुदास विठ्ठलनामाचा डांगोरा पिटीत राहिले. एवढा प्रचंड निर्धार असलेल्या या भक्ताची भक्तवत्सल पांडुरंग उपेक्षा करील काय ? भानुदासाची भक्ति पाहून तो विठ्ठल पाण्याहून पातळ झाला, चंद्राहून शीतळ झाला, माउलीहून मवाळ झाला. प्रेमाचा कल्लोळ असा पांडुरंग वात्सल्यभावानें उचंबळला. भानुदासांच्या समोरील सुळाला पल्लव फुटले. तो सूळ फुलाफळांनीं डवरून गेला. हा चमत्कार पाहून राजा चकित झाला. त्यानें भानुदासांच्या चरणीं

माथा नम्र केला आणि विचारलें, " महाराज, आपण इकडे कशा-करितां आलांत ? "

भानुदास म्हणाले, " पंढरपुरांतील मंदिरांत आमचे वारकरी विठ्ठलाच्या विरहानें जीवनाविण असलेल्या मासोळीप्रमाणें तळमळत आहेत. तेव्हां मला विठ्ठलमूर्तीची भीक घाला. "

ही निष्ठा पाहून राजानें समारंभानें मूर्ति पालखीत ठेवली आणि वाजतगाजत पंढरपुरास पाठविली. भानुदास पंढरपुराजवळ आलेले पाहतांच हजारों वैष्णववीर भजन करीत त्यांना सामोरे गेले. त्यांनीं विठ्ठलमूर्ति रथावर ठेवून तिची मिरवणूक काढली. आजहि एका-दशीला पंढरपुरास मोठ्या समारंभानें ही मिरवणूक निघते. भानु-दासांनी विजयनगरहून आणलेल्या मूर्तीच्या मंगल दिवसाचें तें स्मारक होय.

## : ५ : विठ्ठल शंकर दुजा नाहीं !

आतां आणखी एका संताची कथा ऐका हं.

नरहरि सोनार हे पंढरपुरासच राहात. मात्र ते पक्के शैव-शंकराचे भक्त-होते. शंकराशिवाय कोणत्याहि दैवताचें तोंडहि पाहायचें नाहीं, असा त्यांचा कडक नियम होता. पंढरपुरास राहूनहि त्यांनीं कधी विठ्ठलाचें दर्शन घेतलें नव्हतें.

एकदां काय झालें, एका सावकाराला विठोबाच्या कमरेला सोन्याचा करगोटा करायचा होता. तें काम नरहरि सोनाराकडे आलें. सावकारानें देवाच्या कमरेचें माप नरहरि सोनाराला दिलें. नरहरीनें करगोटा तयार केला. सावकारानें तो मूर्तीस घातला तर थोडा लहान झाला; म्हणून तो त्यानें नरहरि सोनाराकडून वाढवून थोडा मोठा करून आणला; तर तो मोठा झाला.

असा तो करगोटा कधी लांब व्हावा तर कधीं आंखुड व्हावा. असें चार वेळां झालें. तेव्हां सावकारानें नरहरीला स्वतः येऊन माप घ्यायला सांगितलें. शेवटीं विठोबाचें तोंड न पाहतां माप घेतां यावें म्हणून डोळ्यांवर फडकें बांधून स्वतः नरहरि सोनार देवळांत आले आणि हातांनीं मूर्ति चाचपूं लागले. तर त्यांच्या हाताला जटाधारी मस्तक, जटेंत गंगा, गळ्यांत सर्पालंकार अशी शंकराची मूर्ति लागली. हे शंकरच आहेत असें वाटून त्यांनीं डोळे सोडले तर समोर विठ्ठलाची मूर्ति !

या प्रसंगानें शंकर आणि विठ्ठल हीं एकाच दैवताचीं रूपें आहेत हा बोध नरहरि सोनारांना झाला आणि ते वारकरी संप्रदायांत येऊन विठ्ठलभक्त बनले.

या प्रसंगाची खूण म्हणूनच कीं काय आजहि पंढरीरायाचें मस्तक शिवलिंगाच्या आकाराचें आहे.

❀ ❀ ❀

# : ६ : येथें कां रे उभा श्रीरामा ?

विठ्ठलाच्या समोरील गरुडाच्या उजव्या हाताला तो बघा भीमरूपी महारुद्र ! या मारुतीसंबंधीं अशी कथा आहे :

श्रीसमर्थ रामदासस्वामी एकदां पंढरीला आले. रामदासांच्या मुखांत अखंड रामनामाचाच गजर असायचा. रामदासांनी विठ्ठलाचें दर्शन घेतलें आणि " पुंडलीकवरदा हरिविठ्ठल " असा जयघोष करण्याऐवजी यांच्या तोंडून नित्याप्रमाणें " जयजय रघुवीर समर्थ " असाच जयघोष झाला.

विठोबाचे पुजारी बडवे लोक गडबडून गेले. सारेजण रामदासांवर रागावले. विठ्ठलाच्या मंदिरांत रामनामाचा घोष कसा ? त्यांनी रामदासांना बजावलें. विठ्ठलनाम उच्चारण्यास सांगितलें. पण रामदासांना काय ! शेवटी बडवेमंडळी हट्ट सोडीचनात. तेव्हां सद्गदित होऊन रामदासांनीं देवाला आळविलें :

येथें का रे उभा श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ।। ध्रु० ।।
काय केली सीतामाई । येथें राही–रखुमाबाई ।। १ ।।
काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ।। २ ।।
काय केली शरयू-गंगा । येथें आणिली चंद्रभागा ।। ३ ।।
धनुष्यबाण काय केले । कर कटावरी ठेविले ।। ४ ।।
काय केलें वानरदळ । येथें मिळविले गोपाळ ।। ५ ।।
रामीं रामदासी भाव । तैसा होय पंढरीराव ।। ६ ।।

रामदासांनी प्रेमाश्रूंनी विठ्ठलाचे चरण भिजविले; आणि काय आश्चर्य !

मंदिरांतील सर्वच प्रकार एकदम बदलला. विठ्ठलमूर्तीच्या ठिकाणी सर्वांना श्रीरामाचीच मूर्ति दिसली.

अयोध्येचा सारा दरबार त्या मंदिरांत दिसूं लागला. रामाच्या शेजारी सीतामाई, उजवीकडे लक्ष्मण, समोर हनुमंत आणि वानरदळ.

हा चमत्कार पाहून बडव्यांनीं आपले तोंबे फेकले, दंड दूर केले आणि साऱ्याजणांनीं समर्थ रामदासांच्या चरणावर लोटांगणें घातलीं.

रामदासांचे नेत्र भरून आले. त्यांच्या प्रार्थनेनें विठ्ठलाचें सुंदर ध्यान रामरूपच बनलें. रामदासांनी विठ्ठलचरणीं मस्तक नम्र केलें. आणि नंतर गरुडाजवळच भीमरूपी हनुमानाची स्थापना केली.

卐 卐 卐

## : ७ : देव जेवला !

नामदेव सहा सात वर्षांचे होते तेव्हांची गोष्ट :

नामदेवांचे वडील दामाजी शिंपी मोठे विठ्ठलभक्त होते. देवाला नैवेद्य दाखविल्याशिवाय ते अन्न घेत नसत. नित्यनेमच होता तो त्यांचा.

एकदां काय झालें, दामाजींना कामासाठीं परगांवीं जावें लागलें. त्या दिवशी नामदेवांची आई गोणाई म्हणाली, " बाळ नामदेवा, आज देवाला नैवेद्य तूंच घेऊन जा. नंतर जेवण कर. "

बाल नामदेव पीतांबर नेसला. तो नैवेद्याचें ताट घेऊन देवळांत गेला. त्यानें तें ताट विठ्ठलापुढें ठेवलें आणि हात जोडून तो म्हणाला, " देवा, आज मी आणला आहे नैवेद्य. लवकर जेवण कर; मला मोकळें कर. "

बराच वेळ झाला तरी देव कांही नैवेद्य खाईना. छोटा नामदेव अस्वस्थ झाला.

नामदेवानें डोळे मिटले. हात जोडले. पुन्हां प्रार्थना केली. पण छे ! आतां काय करावें ? नामदेव काकुळतीनें म्हणाला, " रागावलास

२०७९६

का रे देवा माझ्यावर ? आज बाबा गांवाला गेले आहेत म्हणून मला आणावा लागला हा नैवेद्य ! घे, जेव बाबा लौकर!"

तरीहि देव येईना, नैवेद्य खाईना. मग नामदेवानें निर्धारच केला की, देव जेवल्याशिवाय येथून हालायचेंच नाही. काय वाटेल तें होवो !

कलती मान करून केविलवाणी उभी राहिलेली नामदेवाची ती गोजिरवाणी चिमुकली मूर्ति कितीतरी वेळ हट्ट धरून उभी होती. पाय दुखूं लागले तरी नामदेव जागचा हललाच नाही.



पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराचा कळस

हा प्रकार पाहून देवाला दया आली. आणि काय नवल पाहा—

साक्षात् शंख-चक्रधारी देव तेथें प्रगट झाले. त्यांनी नामदेवाच्या पाठी-वरून हात फिरविला आणि प्रेमानें हंसून तो नैवेद्य खाऊन टाकला.

देव जेवत होता. बाळ नामदेव मात्र टक लावून तें सुंदर ध्यान पाहात होता. नामदेवाच्या डोळ्यांत-मनांत ती सुंदर मूर्ति भरून गेली.

देवाचें जेवण झालें. देव पुन्हां आपल्या जागेवर जाऊन पहिल्यासारखे उभे राहिले. रिकामें ताट घेऊन नामदेव उड्या मारीत घरीं आला.

नामदेवानें आईला सर्व सांगितलें. तिला नवल वाटलें. ती गप्पच झाली ! दामाजी गांवाहून आले. तों पत्नी त्यांना म्हणाली, " अहो, काल नामदेवानें देवाला नेलेला नैवेद्य देवानें स्वतः खाल्ला ! काय तरी चमत्कार ! "

दामाजींना ती गोष्ट खरी वाटेना. मग दुसऱ्या दिवशीं नामदेवाजवळ पुन्हां देवाचा नैवेद्य देण्यांत आला. नामदेव देवळांत गेला. त्यानें देवापुढें ताट ठेवलें, हात जोडले.आणि त्यानें पुन्हां हट्ट घेतला

पुन्हां देव प्रगटले आणि जेवले. हा चमत्कार दामाजींनी समक्ष पाहिला. ते लगेच पुढें झाले. त्यांनी देवाचें दर्शन घेतलें नामदेवाला उचलून घेतलें आणि त्यांच्या डोळ्यांतून घळघळा आनंदाश्रु आले.

अहाहा ! धन्य तो बाळ नामदेव ! थोर त्याची भक्ति आणि थोर तें प्रेम !

बाळपणापासून तें सुंदर ध्यान समक्ष पाहिलेला नामदेव पुढें श्रेष्ठ भक्त म्हणून प्रसिद्ध झाला. त्यानें भागवतधर्माचा भारतभर प्रसार केला.



## : ८ : देवाच्या खांद्यावर वाकळ

नामदेवाची दासी जनी. तिचें भक्तिप्रेम फारच अलौकिक होतें. स्वत. श्रीविठ्ठल तिच्या घरीं रोज जात. तिला मोलाचीं कामें प्रत्यक्ष करूं लागत. अशीच एकदां गंमत झाली.

एके रात्रीं जनीला देव दळूं लागले. दळतां दळतां पहांट झाली.



देव गडबडीनें देवळांत परत गेले. पण त्या गडबडींत देवांची वैजयंती माळ आणि शालजोडी जनीच्या घरींच विसरली. जातां जातां देवांनीं गडबडींत जनीची वाकळच बरोबर नेली होती.

पहांटेच देवळांत भयंकर गडबड उडाली. बडव्यांनीं देवाच्या खांद्यावर वाकळ पाहिली. तें ध्यान पाहून सर्वांना नवल वाटलें आणि शोध घेतां ती वाकळ जनीची आहे असें दिसून आलें.

देवाची वैजयंती माळ आणि शालजोडी जनीनें चोरली, असा पुकारा झाला. राजानें मुद्देमालासह जनीला पकडलें, तिची धिंड काढली आणि तिला सुळावर देण्याचा हुकूम फर्मावला. नामदेवांना खूप वाईट वाटलें.

आतां जनीला सुळावर देणार ही बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली. सुळाजवळ बघ्यांची अलोट गर्दी जमली. कांहीं म्हणूं लागले,

" गरीब बिचारी जनी देवाचा हार कशी चोरील ? " पण निव्वळ बुद्धिवादी होते ते म्हणाले, " अहो, या भोंदूपणाखालींच चोऱ्या होतात. "

इकडे सुळावर चढण्याअगोदर जनीनें देवाचा धांवा केला. ती देवाला म्हणाली, "देवा, तुला माझा कंटाळा का रे आला ? ही जनी या जगीं नसावी, असेंच तुला वाटलें असेल ! इच्छा तुझी ! मी तुला दोष कसा देऊं ? माझ्याच दैवांत होतें तसें घडलें. पण शेवटी एकदां दर्शन दे म्हणजे झालें. देवा, तुझ्या पायाशीं आतां लौकर ने मला !"

इतक्यांत आंब्याच्या मोहराचा सुगंध सुटला आणि त्या सुळाच्या जागीं एक डवरलेला आम्रवृक्ष दिसूं लागला. तो चमत्कार सर्वांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला. राजाच्या तोंडचें पाणी पळालें. आनंदाश्रूंचे पूर लोटले. सर्वांनी भक्त जनाबाईचा जयजयकार केला. जनाबाईला वाटलें, या आंब्याच्या झाडाच्या रूपानें आपल्याला विठ्ठलानेंच दर्शन दिलें. तिच्या मनःचक्षूंना तेथें विठ्ठलाचें तें सुंदर ध्यान दिसूं लागलें.

जनाबाईनें आपल्या पांडुरंग-भक्तीबद्दल निर्वाळा दिला आहे

नामयाचे ठेवणें जनीस लाधलें । धन सापडलें विटेवरी ।।
धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा ।।
कामधाम माझे विठोबाचे पाय । दिवसनिशी पाहे हारपली ।।
माझ्या वडिलाचें दैवत तो हा पंढरीनाथ । तेणें माझा अर्थ पुरविला ।।
संसारींचें सुख नेघे माझे चित्तीं । तरीच पुनरावृत्ति चुकविल्या ।।
नामयाचे जनी आनंद पै झाला । हृदयीं बिंबला पांडुरंग ।।

❖ ❖ ❖

अनुक्रम ..७५९७७.......... दि. अ. प्रवास
क्रमांक ...५०३...... दि. २२।३।७१

# : १ : असें हें सुंदर ध्यान !

पंढरीच्या या विठ्ठलमंदिराबद्दलहि थोडी ऐतिहासिक माहिती आतां वाचूं या.

पंढरपूर येथील विठ्ठलमंदिर प्रथम कधीं बांधलें असावें व त्यांतील हल्लीची विठ्ठलाची मूर्ति त्या मंदिरांत केव्हांपासून असावी यासंबंधींचा निर्णय इतिहास संशोधकांनीं केलेला नाहीं. मात्र या देवळासंबंधीं सांपडलेला जुना शिलालेख मराठींत असून त्यांत देवाला दिलेल्या देणग्यांचा तपशील आहे. या लेखांतील कालाचा जुना उल्लेख शके ११९५ म्हणजे इ. स. १२७३ हा आहे. या उल्लेखावरून पंढरीचें विठ्ठलमंदिर तेराव्या शतकाच्या पूर्वींचें असावें. या लेखांत श्रीविठ्ठलदेवरायाच्या पूजेअर्चेसाठीं मोठाल्या रकमा देणाऱ्यांचीं नांवें कोरलीं आहेत. यांत कांहीं नांवें महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषांचीं आहेत. या लेखांतील



उल्लेखावरून त्या काळींहि कर्नाटक, तेलंगण, पैठण, नगर, वऱ्हाड वगैरे विविध भागांतून सर्व जातींचे भाविक पंढरीला येत असले पाहिजेत. विशेष म्हणजे या शिलेच्या मध्यभागीं मोठ्या अक्षरांत देवगिरीचे रामदेवराव यादव आणि त्यांचे कारभारी हेमाडपंत यांचीहि

नांवें कोरलेलीं आहेत. विठ्ठलाच्या सेवेसाठीं अशाप्रकारें राजापासून रंकापर्यंत सर्वांनी मदत केली आहे. इतक्या जुन्या काळीं पंढरपूरच्या वारकऱ्यांनी विठ्ठलाच्या पूजेअर्चेची कायमची व्यवस्था लावण्यासाठीं मोठी रकम उभारली, त्यासाठीं एक व्यवस्थापक मंडळ नेमलें आणि त्यांचे मुख्य रामदेवराव यादव होते, असें या शिलालेखावरून दिसतें.

चला, आतां आपण देवाच्या गाभाऱ्यांत जाऊं.

बहुतेक ठिकाणच्या मंदिरांत विठोबा आणि रखुमाई किंवा विठोबा आणि राही-रखुमाई अशा मूर्ति शेजारीशेजारी असतात. पण येथें मात्र मुख्य देवळांत फक्त विठ्ठलाचीच मूर्ति आहे. विठ्ठलाची मूर्ति सुमारें साडेतीन फूट उंचीची आणि काळ्या वालुकामय शिळेची आहे. हिच्या डोक्यावर पारशी लोक घालतात त्याप्रमाणें उंच आणि कंगोरेदार टोपी आहे. त्याला कांहीजण मुकुट म्हणतात, तर कांहीजण शिवलिंग म्हणतात. मूर्तीचें तोंड उभट आहे. गाल फुगीर आहेत. कानांमध्यें मकरकुंडलें माशाच्या आकाराचीं कुंडलें आहेत. कानांतील हीं कुंडलें खांद्यापर्यंत टेकलेलीं आहेत. गळ्यांत कौस्तुभ-मण्यांचा हार आहे. छातीवर श्रीवत्सलांछन आहे. दंडावर दुहेरी बाजूबंद आणि मनगटावर मणिबंध आहेत. शंखांत डाव्या हाताचीं बोटें अडकवून तो हात शंखासह कमरेवर ठेविला आहे. उजव्या हातांत कमळाचा देठ धारण करून तो हात उताणा व अंगठा खालीं येईल असा कमरेवर ठेवला आहे. कमळाचा देठ लहान असून कळी मांडीवर लोळत आहे. कमरेला तिहेरी मेखला म्हणून कमरपट्टा आहे. ही मूर्ति एकाच चौकोनावर-विटेवर उभी आहे. विटेखालीं उलटें कमळ आहे.

या मूर्तीसंबंधीं निरनिराळ्या संतांनी केलेलीं वर्णनें आपण पाहूं या.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात :

योगिया दुर्लभ तो म्या देखिला साजणी ।
पाहता पाहता मना न पुरे धणी ॥ १ ॥
देखिला देखिला गे माय तो देवाचा देव
फिटला संदेहो निमाले दुजेपण ॥ २ ॥

अनंत वेषीं अनंत रूपीं देखिलें म्या त्यासी ।
बापरखुमादेवीवर विठ्ठलीं खूण बाणली कैसी ॥ ३ ॥

**संत बहिणाबाई वर्णन करते :**

माझा दीनानाथ दीनबंधु हरि
नांदे भीमातीरीं पंढरीये ॥ १ ॥
विटीं नीट उभा समचरण साजिरे
पाउलें गोजिरीं सुकुमार ॥ २ ॥
वैजयंतीमाळा रुळतसे गळां
कासेसी पिवळा पितांबर ॥ ३ ॥
भाळीं ऊर्ध्व पुंड्र कानीं कुंडलें गोमटीं
चंदनाची उटी सर्वांगासी ॥ ४ ॥
शिरीं टोप साजे रत्नाचा साजिरा
काढियेला तुरा मोतियाचा ॥ ५ ॥
शोभती दंतपंक्ति जैश्या हिऱ्याच्या ज्योती
बहिणी म्हणे तया ध्याती ह्रदयामाजीं ॥ ६ ॥

**तुकाराम महाराज म्हणतात :**

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटेवरी ठेवुनिया ॥ १ ॥
तुळसीहार गळां कासे पितांबर ।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभमणी विराजत ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

**जनाबाई म्हणते :**

पाय जोडुनी विटेवरी । कर कटावरी ठेवुनी ॥ १ ॥
रूप सांवळें सुंदर । कानीं कुंडलें मकराकार ॥ २ ॥
गळां माळा वैजयंती । पुढें गोपाळ नाचती ॥ ३ ॥
गरुड सन्मुख उभा । म्हणे जनी धन्य शोभा ॥ ४ ॥

**नामदेव महाराज वर्णन करतात :**

कस्तुरीचा टिळा रेखिला कपाळीं ।
तेणें ते शोभली मूर्ति बरी ॥ १ ॥

श्रीवत्सलाछन वैजयती गळा ।
नेसला पाटोळा तेज पुज ॥ २ ॥
पाउलें समान विटेवरी नीट ।
नामा म्हणे भेट घ्यावी त्याची ॥ ३ ॥

**चोखामेळा सांगतो :**

अनादि निर्मळ वेदाचें जें मूळ ।
परब्रह्म सोज्वळ विटेवरी ॥ १ ॥
कर दोन्ही कटीं राहिलासे उभा ।
नीळवर्ण प्रभा फाकतसे ॥ २ ॥
आनदाचा कद पाउलें साजिरीं ॥
चोखा म्हणे हरी पढरिये ॥ ३ ॥

**नरहरी सोनार म्हणतात :**

ते हे विटेवरी समचरण साजिरे ।
पाहता गोजिरे नीलवर्ण ॥ १ ॥
उदड वर्णिलें उदड ध्याइलें ।
उदड गायिलें परि न सरेचि ॥ २ ॥
म्हणे नरहरी सोनार क्षराहूनी पर ।
परेहूनी क्षर विटेवरी ॥ ३ ॥

**अशा या विठ्ठलाच्या मूर्तीच्या पायांवर लक्षावधि भाविक भक्तांनीं आपलीं मस्तकें नमविलीं. त्यांनीं आपल्या जीवींचें हितगुज या ठिकाणीं निवेदन केलें. याच विठ्ठलाच्या चरणांनी लक्षावधि भाविकांचें विविध ताप निववीले. त्यांच्या नेत्रांचीं पारणीं फेडली, त्यांचें जीवित धन्य केलें.**

विठ्ठल विठ्ठल गजरीं । अवघी दुमदुमली पढरी ॥
होतो नामाचा गजर । दिंड्या-पताकाचे भार ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण ॥
हरिकीर्तनाची दाटी । तेथें चोखा घाली मिठी ।
पुडलीकवरदा हरीविठ्ठल ।
श्रीज्ञानदेव तुकाराम ॥

❖ ❖ ❖

# :१०: श्रीविठ्ठलमंदिरांतील दैनंदिन उपासनाक्रम

दररोज पहांटे चार वाजतां भक्त मंडळी व पुजारी भूपाळ्या म्हणून देवास जागे करतात. नंतर पुजारी त्याचे पाय धुतात, गंध लावतात, पुष्पमाला अर्पण करतात. धूपदीप, नैवेद्य होऊन काकड आरती ओवाळतात. मंत्रपुष्पादि विधि होऊन भक्त मंडळी त्याच वेळेपासून राउळांत गर्दीच गर्दी करतात. आजहि प्रत्येक पूजेच्या वेळीं, आरतीच्या वेळीं विठ्ठलमंदिरांत अफाट गर्दी होते.

देवाची पूजा करणारे लोक आहेत त्यांना बडवे म्हणतात. देवाच्या नित्य पूजेसाठीं—व्यवस्थेसाठीं एक बडवे कमिटी आहे. त्या कमिटीतर्फे ही सर्व व्यवस्था ठेवली जाते.

काकडा झाल्यावर लगोलग देवाची षोडशोपचार पूजा करतात. या पूजेंत पंचामृतस्नान, शुद्धोदकस्नान, वस्त्र-अलंकार-परिधान, आणि आदर्शदर्शन-आरसा दाखविण्यासारखे विधी आहेत. याच वेळीं श्रीविठ्ठलाच्या मुखाला लोण्याचा गोळा लावतात. आणि विशेष म्हणजे हा गोळा खालीं पडत नाहीं. हा सर्व प्रातः-पूजेचा कार्यक्रम सूर्योदयापर्यंत होऊन तेथून पुढें भाविकांना देवदर्शनास परवानगी मिळते.

सकाळीं नऊ वाजतां भाविकांतर्फे देवाची महापूजा होते. कोणताहि भक्त यावेळीं देवाला स्नान घालूं शकतो. दुपारीं बारा वाजतां दररोज पांच पक्वान्नांचा नैवेद्य असतो. नैवेद्यांत पुरणपोळी खास असतेच.

दुपारीं चार वाजतां पापप्रक्षालन करून श्रीपांडुरंगाला वस्त्रालंकार घालतात. अलंकारांतहि प्रकार आहेत. कांहीं केवळ सोन्याचें, कांही मोत्याचें तर कांहीं जडावाचें काम केलेले. देवाच्या

मस्तकावर सोन्याचा मुकुट, त्यावर शिरपेंच. कपाळाला सोन्याचें नामगंध, गळ्यांत बोराएवढ्या आकाराच्या चारपांच सुवर्ण मणिमाला, कौस्तुभमणि, सुवर्णकमळाचा हार, पुतळ्यांच्या माळा, मोहरांचे हार, चंद्रहार, सूर्यहार आणि सोन्याचें जानवें घालतात. हातांत सोन्याची मुरली असते. दंडांत बाहुभूषणें असून हातांत सोन्याची कडीं व तोडे असतात. कानांत मोत्यांचा चौकडा, मकर-कुंडलें, चमचमत असतात. पायांत पैंजण व सोन्याच्या सांखळ्या असतात.

वस्त्रालंकार विभूषित विठ्ठलमूर्तीचें 'सुंदर तें ध्यान' पाहून भक्ताचा आनंद ओसंडून जात असतो.

सायंकाळीं सहा ते साडेसहापर्यंत धूपारती होते. रात्रीं दहा वाजतां विठलदेवाची शेजारती होते.त्यावेळीं चांदीचा पलंग असलेल्या शेजघरापर्यंत पांडुरंगासाठी पुजारी पायघड्या घालतात.सर्व सेवकरी व भक्तमंडळी मुखानें पांडुरंगाच्या विरुदावलीचा मोठ्यानें उच्चार करीत असतात : "स्वामिन्! अशरणशरण, करुणकरुणालय, अनंतकोटिब्रह्मांडनायक, राजाधिराज, भक्तकामकल्पद्रुम, सर्वतंत्र-स्वतंत्र, चंद्रभागातीरनिवास, रुक्मिणी पांडुरंग दयानिधे! स्वामिन् सुखनिद्रां कुरु ॥"

असें सांगतात कीं, पूर्वी पहांटेच्या वेळी शेजघरांतल्या पलंगा-वरील वस्त्रांना सुरकुत्या पडलेल्या दिसत. उच्छिष्ट तांबुल बाजूस पडलेला दिसे.

<u>नैमित्तिक :</u>

प्रत्येक बुधवारीं आणि प्रत्येक शनिवारीं विठोबाला अभ्यंग-स्नान घातलें जातें. हरिदिनी—एकादशीच्या दिवशींचा विशेष म्हणजे शेजारती झाल्यावर देव झोपायला जात नाहींत. या तिथीला उपवासाच्या पदार्थांचा नैवेद्य दाखवितात.

धनसंक्रांतीपासून मकरसंक्रांतीपर्यंतच्या शीतकालांत देवाला खिचडीचा नैवेद्य होतो आणि पोषाखाचे वेळीं देवाला ‘ कानपट्टी ’ बांधतात.

माघ शुद्ध पंचमीपासून रंगपंचमीअखेर देवाच्या पायांवर गुलाल वाहतात. त्याचबरोबर डोक्याला ‘ बत्ती पागोटें ’ बांधतात.

उन्हाळ्याच्या दिवसांत गार पाणी, उपहाराचे पदार्थ आणि तांबूल असें तिसरे प्रहरी देवाला अर्पण करतात. पूर्वी चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून मृगनक्षत्रापर्यंत तिसरे प्रहरीच देवाला चंदनाची उटी लावीत. हल्लीं उटी रात्री शेजारतीच्या वेळीं लावतात. त्यावेळचें पांडुरंगाचें ध्यान इतकें नयनरम्य आणि आनंददायक असतें कीं, ‘ पाहतां धणी न पुरे ! ’ ‘ सुंदर तें ध्यान ’ भक्त आपल्या हृदयांत सांठविण्याची इच्छा करतो.

आषाढी–कार्तिकी एकादशी यात्रांना पंढरपुरांत फारच गर्दी होते. भक्तांची सोय व्हावी म्हणून यात्रेपूर्वी शुद्ध पंचमीस देवाचा पलंग बाहेर आणून ठेवतात. त्या वेळेपासून ‘ प्रक्षाळपूजा ’ करीपर्यंत सर्व नित्योपचार स्थगित करतात. फक्त सकाळचें स्नान, नैवेद्य होतो आणि यात्रेकरूंना श्रीपांडुरंगदर्शनास अहोरात्र प्रवेश मिळतो.

### उत्सव

पांडुरंगाच्या राउळांत आषाढ वद्य प्रतिपदेस ‘ काला ’ करतात. हाच ‘ नामदेवकाला ! ’ संत नामदेव स्वतः असा काला देवापुढें करीत असत. त्यांचेनंतर त्यांच्या वंशांतील मंडळी असा काला करीत असत. काल्याची दहिहंडी मारुतीपाशीं फोडतात त्या हंडीतला दह्याचा प्रसाद मिळविण्यासाठीं भाविकांची फारच झुंबड उडते. सध्यां हा काला हरिदासांनी करण्याची वहिवाट पाडली आहे. हरिदासाचे डोक्याला पागोटें बांधून वाजतगाजत त्याला देवळांत आणतात आणि देवापुढें कीर्तन होतें. काल्याचे वेळीं

गोकुळांत कृष्ण जसे खेळ खेळत तशा प्रकारचा कांहीं खेळ भक्त मंडळी करून दाखवतात.

श्रावण मासांत गोकुळ अष्टमीचा उत्सव होतो. वद्य प्रतिपदे-पासून नऊ दिवस. त्यावेळींहि कथाकीर्तन आणि ब्राह्मणभोजन होतें. भाद्रपदांत गौरी-गणपतीचा सण साजरा करतात. मोठ्या घंटेजवळ गणपती बसवतात. अनंतचतुर्दशीस त्याचें विसर्जन होतें.

कार्तिक वद्य द्वितीयेस आषाढ मासाप्रमाणेंच काला होऊन प्रसाद वांटला जातो.

अशी समजूत आहे कीं, भक्तजनांस दर्शन देऊन श्रीविठ्ठलाला शीण येतो. तेव्हां यात्रा झाल्यावर देवाची प्रक्षाळपूजा करतात. त्या दिवशी उंची उंची अत्तरें व उटणीं लावून, देवाचे अंगाला साखर चोळून देवाचें अंग स्वच्छ करतात. कांहीं गांवांतल्या भक्तांकडून साखरपाणी देवाला स्नान घालण्यासाठीं येतें. त्या दिवशीं अनेक लोक देशाला स्नान घालतात. त्या दिवशीं देवाची महापूजेसारखीच पूजा होत असते.

श्रीपांडुरंगाचे सेवेकरी आहेत त्यांना पुजारी, परिचारक, डिंगरे, हरिदास, बेणारे, डांगे, दिवटे; म्हणतात. ह्या सातहि प्रकारच्या सेवेकऱ्यांकडे वेगवेगळीं कामें असून ते प्रत्येक कार्यक्रमास हजर असतात.

## पंढरपुरास जाण्याचे मार्ग

मध्यरेल्वेनें पुण्याहून सोलापूरमार्गे कुर्डुवाडी जंक्शनवर उतरून पंढरपुरास जातां येतें. दक्षिण रेल्वेनें पुण्याहून मिरजेपर्यंत व तेथून पंढरपूर. हल्लीं स्टेट ट्रान्स्पोर्टच्या मोटारीनें महाराष्ट्रांतील बहुतेक जिल्ह्याच्या ठिकाणाहून पंढरपुरास जातां येतें.

पंढरीस गेल्यावर पूर्वी भाविक यात्रेकरू पुजारी बडवे यांचे-कडेच उतरण्याची सोय लावीत असत. आतां पंढरपुरांत अनेक लॉजिंग बोर्डिंगें,खानावळी आहेत.शिवाय प्रत्येक फडकरी यात्रेकरूंच्या प्रत्येक समाजाच्या आणि गाडगे महाराज, तनपुरे महाराज यांच्या-सारख्यांच्या धर्मशाळाहि आहेत. तेथें उतरण्याची सोय होते.

यात्रेच्या दिवसांत पांडुरंगाच्या दर्शनासाठीं मात्र अक्षरशः सहा सहा तास रांगेंत उभें रहावें लागतें. एरवीं दर्शन सहज होतें. स्नान करून मंदिरांत जाऊन श्रीची पुजा करतां येते.

पंढरपुरच्या पंचक्रोशींतील पहाण्याजोगीं स्थानें

पद्मावती : पश्चिमेस अर्ध्या मैलावर देऊळ व पद्मावतीचें तळें आहे. सकवारबाई पवार यांनी हें मंदिर अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत बांधलें.

श्रीधरस्वामीची समाधि : हरिविजय, रामविजय, पांडव-प्रताप इ. पौराणिक ग्रंथांचे कर्ते, प्रसिद्ध मराठी कवि श्रीधरस्वामी नाझरेकर यांची समाधि कुंभारघाटावर आहे.

विष्णुपद : चंद्रभागेच्या पात्रांत इ. स. १६४० मध्यें धामण-गांवकर यांनी हें स्थान बांधलें. पांडुरंगाच्या मंदिरापासून सुमारें पाऊण मैल अंतरावर आहे.

गोपाळपुर : गांवच्या दक्षिणेस एक मैलावर असून तेथें श्रीगोपाळकृष्णाचें मंदिर आहे. तेथें भीष्मकराजाचेंहि देऊळ असून जवळच जनाबाईची गुहा व तिची फाटकी वाकळ दाखवितात.

तांबडा मारुती : याची स्थापना समर्थ रामदासांनी केली. महाद्वारवेशीतून वळतांच डाव्या हातास हें मंदिर आहे.

श्रीरुक्मिणीचें मंदिर पांडुरंगमंदिराशेजारींच आहे. पंढरपुरा-पासून अवघ्या तेरा मैलांवर भक्त दामाजीपंताचें मंगळवेढें गांव आहे.

# आरती श्रीविठ्ठलाची

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा ।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राहीच्या वल्लभा ! पावे जिवलगा ॥ ध्रु. ॥

तुळशीमाळ गळां कर ठेवुनि कटीं ।
कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढें उभे राहती ॥ २

REFBK-0010796

धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ।
राही रखुमाबाई राणी या सकळा ।
ओवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥

ओवाळूं आरत्या कुर्वंड्या येती ।
चंद्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिंड्या पताकां वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती ।
दर्शनेहळामात्रें तयां होय मुक्ति ।
केशवासी नामदेव भावें ओवाळिती ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

❋ ❋ ❋